'धि गोवा हिंदू असोसिएशन' कला विभाग निर्मित आणि 'नाट्यसंपदा कलामंच' प्रकाशित 'संगीत मत्स्यगंधा' या अजरामर नाटकाची दुसरी इनिंग आजपासून सुरू होत आहे. त्यानिमित्ताने या नाटकाच्या आजवरच्या सुवर्णप्रवासाचा धांडोळा.

'गुंतता हृदय हे', 'अर्थशून्य भासे मजला', 'साद देती हिमशिखरे' ही गीते प्रत्यक्ष रंगमंचावर अनुभवलेल्या पिढीने आता वयाची किमान सत्तरी पार केली आहे. त्यामुळे मधली पिढी आणि त्यानंतरच्या आमच्या पिढीला ही अजरामर गीते फक्त आकाशवाणीच्या सौजन्याने ऐकता आली, तेवढेच काय ते समाधान. प्रत्यक्ष रंगमंचावर हा सगळा संगीत नाटकाचा सुवर्णकाळ अनुभवता येईल, असे क्वचितच वाटले होते. मधल्या काळात सुनील बर्वे यांनी आपल्या 'हर्बेरिअम' प्रयोगादरम्यान आणि तत्पूर्वी निपुण धर्माधिकारी आणि चमूने 'कट्यार काळजात घुसली' रंगमंचावर आणले होते. दरम्यान, 'कट्यार...' सिनेमास्वरूपात रुपेरी पडद्यावर आला. त्यालाही रसिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. म्हणजेच युवा पिढीला आजही संगीत नाटकांचे अप्रूप आणि औत्सुक्य असल्याचेच अधोरेखित झाले.

या सगळ्या पार्श्वभूमीवर जेव्हा 'धि गोवा हिंदू असोसिएशन'ने आपला कला विभाग सक्रिय करत, पुन्हा एकदा 'संगीत मत्स्यगंधा'चे सुवर्णस्वप्न युवा पिढीला दाखवले आणि ते अथक मेहनतीनंतर आज प्रत्यक्षात आणत, या अजरामर नाटकावरचा पडदा आज तब्बल ५३ वर्षांनी उघडत आहे. कला नेहमीच काळावर मात करत असते, 'संगीत मत्स्यगंधा'सारखी नाटके याचेच द्योतक आहे. वसंत कानेटकर लिखित आणि धि गोवा हिंदू असोसिएशन, कला विभागाची निर्मिती असलेल्या या नाटकाचा पहिला प्रयोग, महाराष्ट्र स्थापनेच्या चौथ्या वर्धापनदिनी म्हणजेच १ मे १९६४ रोजी सादर झाला होता. त्यानंतर मधल्या दोन पिढ्यांच्या मनात या नाटकाच्या आठवणी आणि गाणी अविरत तरळत राहिली. रामदास कामत यांचा 'पराशर' आणि आशालता वाबगावकर यांच्या 'सत्यवती'ची मोहिनी आजही रसिकांवर दिसते. महाराष्ट्र, गोवा आणि बृहन्महाराष्ट्रात या नाटकाचे विक्रमी प्रयोग सादर करण्यात आले.

किशोर शिंदे

दरम्यान, कलाकार विविध सिनेमा-नाटकांमध्ये गुंतत गेल्यामुळे यथावकाश 'मत्स्यगंधा'चे व्यावसायिक प्रयोग थांबवण्यात आले. पण या नाटकाची लोकप्रियता एवढी होती की, 'धि गोवा हिंदू असोसिएशन'ने प्रयोग अधिकृतरीत्या थांबवल्यानंतर गोवा आणि कोकणातील अनेक स्थानिक नाट्यमंडळांना 'मत्स्यगंधा' आपापल्या नाट्यसंघामध्ये सादर करण्याचा मोह आवरता आला नाही. त्यांच्या या प्रयोगांचे स्थानिकांनीही स्वागत केले. आणि आता तब्बल अर्धशतकानंतर दस्तुरखुद्द 'धि गोवा हिंदू असोसिएशन'ने पुढाकार घेत मराठी रंगभूमीला भरभरून नाट्यानुभव दिलेला आपला 'कला विभाग' पुन्हा एकदा सक्रिय करत 'संगीत मत्स्यगंधा' नाटकासोबत रंगमंचावर पुनर्प्रवेश केला आहे. त्यांच्या या प्रोत्साहक पावलांमुळे आता पुढील काळामध्ये नाट्यप्रेमींना अधिकाधिक सकस नाट्यानुभव घेता येणार आहे.

धि गोवा हिंदू असोसिएशन (कलाविभाग) निर्मित
नाट्यसंपदा कला मंच प्रकाशित

संगीत मत्स्यगंधा

अद्वितीय संगीत

मूळ नाटकात पराशराची मुख्य भूमिका साकारणारे रामदास कामत आता नव्या चमूला यातील पदांसाठी मार्गदर्शन करत असून, प्रसिद्ध संगीतकार अशोक पत्की संगीत दिग्दर्शन करत आहेत. तर प्रसिद्ध अभिनेत्री आणि नाट्यदिग्दर्शिका संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांनी नाटकाचे दिग्दर्शन केले आहे. तर 'धि गोवा हिंदू असोसिएशन, कला विभाग' निर्मित हे नाटक ज्येष्ठ नाट्यनिर्माते अनंत पणशीकर यांची 'नाट्यसंपदा कलामंच' ही प्रख्यात नाट्यसंस्था प्रकाशित करत आहे, हेही इथे नमूद करण्याजोगे!

कलाकारांची कल्पक निवड

या नाटकाच्या कलाकार निवडीसाठी सोशल मीडियाचा अत्यंत कल्पकपणे वापर करण्यात आला आहे. यातील दोन्ही प्रमुख कलाकारांची व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून ऑडिशन घेण्यात आली. यासाठी २२ ते ३० वयादरम्यानच्या १५०हून अधिक गायक कलाकारांनी आपले व्हिडिओ पाठवले होते. त्यातून निवडक ३० जणांची प्रत्यक्ष ऑडिशन आणि त्यातून मूळची राजापूरची असलेली केतकी चैतन्य हिची 'सत्यवती' म्हणून आणि पुण्यातील नचिकेत लेले याची 'पराशर'च्या भूमिकेसाठी निवड करण्यात आली आहे.

'मत्स्यगंधा' गोमंतकीयांच्या भेटीला!

'मत्स्यगंधा'ने रसिकांच्या हृदयावर अविरत राज्य केले आहे. त्यामुळे आता प्रदीर्घ विरामानंतर हे नाटक नव्या संचात, नव्या उत्साहात रंगमंचावर दाखल करत असल्याने गोवा आणि महाराष्ट्रासह मराठी नाट्यरसिक जिथे जिथे पसरला आहे, त्या प्रत्येकापर्यंत 'मत्स्यगंधा' पोहोचवण्याचा निर्माते आणि प्रकाशकांचा प्रयत्न असणार आहे. आज, २४ सप्टेंबर रोजी नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग मुंबईतील शिवाजी मंदिर येथे होत असून, दिवाळीच्या सुमारास म्हणजे, १५ ते २२ ऑक्टोबर दरम्यान 'मत्स्यगंधा' गोमंतकीयांच्या भेटीला येण्याची शक्यता आहे.

एक कलात्मक प्रवास

निरूपा केणी

धि गोवा हिंदू असोसिएशनचा कलाविभाग जवळ जवळ वीस वर्षांनंतर सक्रिय झाला आहे. अलिकडेच ६ ऑगस्ट, २०१७ रोजी धि गोवा हिंदू असोसिएशन कला विभाग निर्मित आणि नाट्यसंपदा कला मंच प्रकाशित 'सं. मत्स्यगंधा' या नाटकाचा मुहूर्त धि गोवा हिंदू असोसिएशनच्या 'गोमंतधाम' या डॉक्टर दादासाहेब फडकमकर मार्गावरील वास्तूत दिमाखात साजरा झाला. कला विभागातर्फे पुनश्च नाट्यनिर्मिती करायचीच हा कार्यकर्त्यांचा निर्धार आणि त्यांचे स्वप्न हे सारे आता प्रत्यक्षात उतरत आहे. या नाटकाच्या शुभारंभाचा प्रयोग, आज २४ सप्टेंबर, २०१७ रोजी मुंबईतल्या शिवाजी मंदिरात होणार आहे. अर्थात नाटकाच्या पुनर्निर्मितीसाठी 'सं. मत्स्यगंधा' या नाटकाचीच निवड का केली गेली, हा प्रश्न आम्हाला अनेक वेळा विचारण्यात आला. नाटकाची निवड करतेवेळी कला विभाग आणि नाट्यसंपदा कला मंचातर्फे याही प्रश्नावर विचारविनिमय करण्यात आला होता आणि सर्व दृष्टिकोनातून साधकबाधक चर्चा करून, पूर्ण विचारांती हे नाटक रंगभूमीवर आणण्याचा निर्णय घेण्यात आला.

'सं. मत्स्यगंधा' या नाटकाची संहिता षड्‌रिपूंच्या भोवऱ्यात गरगरणाऱ्या माणसाच्या प्रकृतिधर्मांची आहे. ही कहाणी आहे पराशराच्या पतनाची, सत्यवतीच्या अबोधतेची, शंतनूच्या लालसेची, भीष्माच्या अग्निपरीक्षेची, अंबेच्या सुडाची आणि महाभारताच्या नांदीची. ही कहाणी आहे मानवाच्या प्रवृत्तींच्या युद्धाची. या कहाणीला अंत नाही. प्रत्येक कालखंडात अशा कित्येक सत्यवती, पराशर, शंतनू, अंबा आणि हो; भीष्महीही जन्मतील. प्रत्येक कालखंडात ही कहाणी घडेल. जोपर्यंत ही पृथ्वीमाता असेल, हे ब्रह्मांड असेल तोपर्यंत ही कालातीत कहाणी पुन्हा पुन्हा अवतरेल.

या उत्कृष्ट नाट्यसंहितेचा मतितार्थ तरुणांपर्यंत पोहोचावा, संगीत नाटकाविषयी त्यांना आकर्षण वाटावे, संगीत नाटकाविषयी त्यांच्यात ओढ, गोडी निर्माण व्हावी यासाठी या नाटकाच्या सर्व टप्प्यांवर तरुणाईला सामावून घेण्याचा प्रयत्न धि गोवा हिंदू असोसिएशन कला विभाग आणि नाट्यसंपदा कला मंचाद्वारे होत आहे.

'संगीत मत्स्यगंधा' या नाट्यकलाकृतीचे सिद्धहस्त लेखक प्रा. वसंत कानेटकर, त्यांच्या लेखणीचे सामर्थ्य, त्यांनी रंगवलेल्या व रसिकांना अंतर्मुख करणाऱ्या व्यक्तिरेखा, पं. जितेंद्र अभिषेकी यांचे मंत्रमुग्ध करणारे संगीत ही या नाटकाची बलस्थाने आहेत. या मूळ संहितेस यत्किंचितही धक्का न लावता आजच्या रसिकांना भावेल अशा पद्धतीने हे नाटक आम्ही रसिकांसमोर ठेवत आहोत. धि गोवा हिंदू असोसिएशन कलाविभागाने आजवर उत्तमोत्तम आणि समाजप्रबोधन करणारी विचारप्रवर्तक नाटके रसिकांसमोर सादर केली. ज्या ज्येष्ठांनी हे कार्य केले त्यांचे आशीर्वाद आमच्या पाठीशी निश्चितच असतील.

१९६४ साली 'सं. मत्स्यगंधा' जेव्हा रंगभूमीवर आले त्यावेळी सत्यवती-आशालता वाबगावकर, पराशर- राम दास कामत आणि नाटकाचे दिग्दर्शक व भीष्माची भूमिका साकारणारे श्रेष्ठ कलाकार मास्टर दत्താराम यांनी नवा इतिहास घडवला होता. या पुनर्निर्मित नाटकात रामदास कामत हे तरुण कलाकारांना गायनाचे मार्गदर्शन करत आहेत हे या नाटकाचे भाग्य. आजचे आघाडीचे संगीत दिग्दर्शक अशोक पत्की यांचे पार्श्वसंगीत या नाटकास लाभलेले आहे. संपदा कुलकर्णी-जोगळेकर या नाटकाच्या दिग्दर्शिका आहेत. पंडित अरविंद पिळगावकर यांनी या नाटकासाठी, नाट्यसंपदा कलामंचाचे अनंत पणशीकर यांचे नाव सुचवले होते. अनंत पणशीकर यांनी निर्मिती प्रमुख म्हणून या नाटकासाठी अतिशय मेहनत घेतलेली आहे हे नमूद करणे आमचे कर्तव्य आहे.

शेवटी तरुणाईसाठी या नाटकाचा संदेश काय; तर- प्रेम कधीही आंधळे नसते. आंधळे असते ते आपले मन, आपले विचार, आपल्या प्रवृत्ती. स्त्री-पुरुष निसर्गनियमाप्रमाणे एकमेकांसाठीच घडलेले असतात. समाजाने घातलेल्या आचरणाच्या मर्यादा मनुष्याच्या भल्यासाठी असतात. संस्कारित मन समाजाच्या मर्यादांचे भान ठेवून निसर्गनियमांचे पालन करते. ज्यांना हे जमत नाही ते समाज-पतित होतात. स्त्री-पुरुष दोघांनीही मर्यादांचे उल्लंघन करू नये हा विचार मत्स्यगंधेची कहाणी आपल्या मनात रुजवते. द्वेषभावनेनं द्वेष निर्माण होतो, नकारात्मक वातावरणाची निर्मिती होते आणि त्याचे दुष्परिणाम करणाऱ्याला आणि कुटुंबियांना भोगावे लागतात. जेते असून पराभवाचे दुःख अनुभवावे लागते. मत्स्यगंधा नाटकाची संहिता आपणास विचार करायला लावणारी कहाणी आहे आणि म्हणूनच या नाटकाची पुनर्निर्मिती होत आहे.

(लेखिका धि गोवा हिंदू असोसिएशन, मुंबईच्या संयुक्त कार्यवाह आहेत.)